SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR- 416 004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. – ४१६००४ महाराष्ट्र
PHONE : EPABX 0231-260900, 2609185 थेट : 2609317, 2609110, 2609297
FAX : 0091-0231-2690655, 2691533 व 0091-0231-2692333
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
ज्ञानमेवामृतम्
East : 1992
NAAC "A" Grade

Ref. No. SU/Exam/CAP/Rev./ 312 Date: 1 JUL 2020

# परिपत्रक

**विषय** :- प्रथम वर्ष विधी अभ्यासक्रम व एम. आर्किटेक्चर परीक्षेतील उत्तरपत्रिकांचे फेरतपासणी/ पुनर्गुणपडताळणी अर्जाबाबत.

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन आदेश क्र. DMU/2020/C.R.92/DisM-1 Dt. 29/06/2020.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये राज्यात कोरोना विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रार्दुभावामुळे शासनाकडून लॉकडाऊनची मुदत ३१/०७/२०२० पर्यंत वाढविण्यात आली असून जिल्हाबंदी कायम आहे. फेब्रुवारी -२०२० मध्ये झालेल्या प्रथम वर्ष विधी अभ्यासक्रम व एम. आर्किटेक्चर परीक्षेतील विद्यार्थ्यांना फोटोकॉपी प्राप्त झाल्यानंतर दंडक १०६ 'ब' अन्वये विद्यार्थ्यांकडून उत्तरपत्रिकांचे फेरतपासणी/ पुनर्गुणपडताळणीसाठी अर्ज प्राप्त होणार आहेत. सध्या जिल्हाबंदी लागू असल्याने विद्यार्थ्यांना सदर अर्ज सादर करण्यासाठी विद्यापीठ कार्यालयात येणे शक्य होणार नाही.

त्यास अनुसरून कळविण्यात येते की, प्रथम वर्ष विधी व एम. आर्किटेक्चर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फोटोकॉपी प्राप्त झालेपासून ०७ दिवसांच्या आत विद्यापीठ संकेतस्थळावर फेरतपासणी/ पुनर्गुणपडताळणीसाठीचे अर्ज भरून सदर अर्ज व विहीत शुल्क दि.११/०७/२०२० अखेरपर्यंत आपल्या महाविद्यालयात जमा करावेत.

महाविद्यालयांनी प्राप्त होणारे सर्व फेरतपासणी/ पुनर्गुणपडताळणी अर्ज एकत्रित करून त्यांची विद्यार्थीनिहाय शुल्कासह यादी तयार करावी. तसेच जमा होणारे फेरतपासणीचे एकत्रित शुल्क विद्यापीठाच्या अधिकृत बँकखात्यामध्ये जमा करावे व शुल्क जमा केल्याची पावती व विद्यार्थ्यांची उपरोक्त यादी या कार्यालयाच्या cap@unishivaji.ac.in या ई-मेल आयडीवर दि. १४/०७/२०२० पर्यंत पाठविण्यात यावी.

सदरचे परिपत्रक सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणावे.

आपला विश्वासू,

प्र-संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत : – माहितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठी**

१. मा.प्राचार्य, सर्व संलग्नीत विधी व आर्किटेक्चर महाविद्यालये/संस्था (**दंडक १०६ 'ब' नुसार विहित शुल्क व अर्जाची हार्डकॉपी जमा करून घेण्यात यावी ही विनंती)**
२. मा. संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ, यांचे कार्यालय
३. लेखा नगदी विभाग.
४. इंटरनेट विभाग (सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात यावे.)